# सीप्झ स्थानकाच्या स्लॅबचे बांधकाम पूर्ण

## मेट्रो-३ मार्गिकेवरील कामे वेगात

मुंबई, ता. २२ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो- ३ मार्गावरील पॅकेज- ७ ने सीप्झ स्थानकाच्या स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या पॅकेजमधील मरोळ नाका आणि एमआयडीसी स्थानकांच्या सर्व स्लॅबचे बांधकामही पूर्ण झाले. अशाप्रकारे पॅकेज-७ मधील एकूण ७६ टक्के बांधकाम पूर्ण झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून देण्यात आली.

मरोळ नाका स्थानक एनएटीएम (न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड) पद्धतीने बांधले जाणार असून येथे चार प्रवेशद्वार आहेत; मात्र सीप्झ आणि एमआयडीसी स्थानके कट-अँड-कव्हर पद्धतीने बांधण्यात येत आहेत. येथे अनुक्रमे चार आणि तीन प्रवेशद्वार आहेत. सीप्झ स्थानकावरून दररोज २४ हजारांहून अधिक प्रवाशांनी प्रवास करणे अपेक्षित आहे. परिसरातील वाहनांच्या रहदारीमुळे बरीच आव्हाने उभी राहिली होती; मात्र वाहतूक पोलिस आणि एमसीजीएमच्या साह्याने काम सोपे झाले. मेट्रो-३ सुरू झाल्यानंतर हे स्थानक उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम उपनगरांना जोडण्याचे काम करेल, असे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी सांगितले.

“ सीप्झ प्रामुख्याने व्यावसायिक केंद्र मानले जाते, परंतु सध्या ते उपनगरीय रेल्वेमार्गाद्वारे जोडले गेले नाही. या क्षेत्रामध्ये इलेक्ट्रॉनिक प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा, सीप्झ गाव बस स्थानक, होली स्पिरीट रुग्णालय, आरे दूध वसाहत ही महत्त्वाची स्थळे आहेत. त्यामुळे या व्यवसाय केंद्राला भेट देणाऱ्या प्रवाशांसाठी मोठी सोय उपलब्ध होणार आहे.

**- रणजित सिंह देओल,** व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन.